ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे •अंक ३०२ • सोमवार दि.३१ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

### ३० सप्टेंबरपर्यंत हरकतीची संधी;४ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी

## SIR ची प्रारुप यादी जाहीर, २ कोटी मतदारांची नावे गायब

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात एसआयआर अंतर्गत प्रारूप मतदार यादी आज सोमवार दि.३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली. या प्रारूप यादीतून राज्यातील तब्बल २ कोटी ७ लाख मतदारांची नावे वगळली गेल्याचे समोर आले आहे. घरोघरी पडताळणीदरम्यान आवश्यक माहिती किंवा अर्ज उपलब्ध न होणे, डिजिटायझेशनची प्रक्रिया पूर्ण न होणे तसेच अन्य तांत्रिक कारणांमुळे संबंधित मतदारांची नावे प्रारूप यादीत समाविष्ट होऊ शकलेली नाहीत.असे सांगण्यात येत आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार यादीत शुद्धीकरणासाठी एसआयआर मोहीम राबवली होती. एसआयआय नंतर ३१ ऑगस्ट रोजी निवडणूक विभागाने प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. त्यानंतर एकच गोंधळ उडाला आहे. मात्र या प्रारूप मतदार यादीत नाव नसल्याने संबंधित नागरिकाचा मतदानाचा अधिकार कायमस्वरूपी संपुष्टात आला आहे, असा त्याचा अर्थ होत नाही. निवडणूक आयोगाने संबंधित मतदारांना आपले नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करून घेण्यासाठी दावा दाखल करण्याची संधी दिली आहे. प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांना ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावा दाखल करता येणार आहे. यासाठी संबंधित मतदारांनी फॉर्म क्रमांक ६ भरून आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त दावे आणि हरकतींची छाननी करून त्यावर निर्णय घेण्याची प्रक्रिया २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे प्रारूप यादीत नाव नसलेल्या मतदारांनी मुदत संपण्यापूर्वी दावा दाखल करणे महत्त्वाचे आहे.प्रारूप मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, हे प्रत्येक मतदाराने तपासून पाहावे. भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत मतदार सेवा पोर्टलवर नाव, मतदारसंघ आणि अन्य उपलब्ध तपशीलांच्या आधारे मतदार यादीत नाव शोधता येते.नाव प्रारूप यादीत आढळले नाही, तर संबंधित मतदारांनी विलंब न करता फॉर्म क्रमांक ६ भरून दावा दाखल करावा. दावा दाखल करताना आयोगाने मागितलेली आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. फॉर्म क्रमांक ६: प्रारूप मतदार यादीत नाव नसल्यास नवीन नोंदणी अथवा नाव समाविष्ट करण्यासाठी दावा दाखल करण्यासाठी., फॉर्म क्रमांक ७:मतदार यादीत अपात्र व्यक्तीचे नाव असल्यास त्याविरोधात हरकत नोंदविण्यासाठी., फॉर्म क्रमांक ८: मतदाराच्या नावात, पत्त्यात किंवा अन्य तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी.

दरम्यान, एसआयआरच्या प्रारूप यादीत नाव नसल्याने नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नाही. मात्र, सप्टेंबरपूर्वी दावा दाखल करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करणे पान ४ वर

## मराठा बांधवांनो १२ सप्टेंबरपर्यंत मुंबईत पोहचा-मनोज जरांगे पाटील



अंतरवाली सराटी: मराठा समाज बांधवांनी १२ सप्टेंबरपर्यंत मुंबईत पोहोचण्याचे आवाहन केले. मराठा आरक्षणासाठी लढा उभारणारे मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज केले आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाचा तिसरा दिवसही सरकारच्या ठोस चर्चेविना पार पडला. सरकारकडून अद्याप अधिकृत शिष्टमंडळ न आल्याने जरांगे पाटील यांनी आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट केली आहे. मराठा समाजाने १२ सप्टेंबरपर्यंत हळूहळू मुंबईला जावे. आपल्या सोयीनुसार मुंबईत राहण्याची व्यवस्था करावी. आझाद मैदानावर थेट जाऊ नका. पाहुणे, मित्र आणि नातेवाईकांकडे राहा, असे आवाहन जरांगे यांनी केले. सरकारकडून अद्याप कोणाचाही संपर्क झालेला नसल्याचे सांगत त्यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला. उपोषण सोडणार नाही. मीही मराठा समाजासोबत मुंबईला जाणार, असे त्यांनी स्पष्ट केले. सर्वांनी एकाच वेळी मुंबईकडे जाणे शक्य नसल्याने टप्प्याटप्प्याने मुंबईत पोहोचण्याचे आवाहन त्यांनी केले. मंत्री उदय सामंत यांच्या संभाव्य दौऱ्याबाबत आणि सरकारच्या संपर्काबाबत विचारले असता जरांगे यांनी सरकारवर उपरोधिक टीका केली. २४ तासांत संपर्क साधू म्हणजे पावसासारखे आहे का? हळूहळू सरी पडणार आहेत का? असा सवाल पान ४ वर

## गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीने साजरा करा

### डीजेचा वाद नको-मुख्यमंत्री फडणवीसांचे आवाहन

पुणे:आगामी काळातील गणेशोत्सवात डीजेवरुन वाद न करता सांस्कृतिक पद्धतीने साजरा करावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुणेकरांना केले आहे.



गणेशोत्सवातील डीजेच्या वापरावरून सध्या राज्यात चर्चा आणि वादाला सुरुवात झाली असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत महत्त्वाचे आवाहन केले आहे. पुणे येथे भाजपच्या राज्य कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी गणेशोत्सवाच्या स्वरूपाबाबत आपली भूमिका मांडली. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा आणि सामाजिक एकतेचा उत्सव आहे. त्यामुळे उत्सव साजरा करताना सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य दिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.गणेशोत्सवात डीजेच्या वाढत्या वापरामुळे ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होत असून, त्यावरून विविध स्तरांतून चिंता व्यक्त केली जात आहे. डीजेच्या आवाजामुळे नागरिकांना होणारा त्रास, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच रुग्णांना होणारी गैरसोय याबाबतही चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर डीजेवर बंदी घालण्याची मागणी काहींकडून करण्यात येत आहे.या वादावर भाष्य करताना फडणवीस यांनी थेट डीजेच्या मुद्द्यावर संघर्ष करण्याऐवजी गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा जपण्याचे आवाहन केले. पुणेकरांना गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीने साजरा करता येऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले.महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचे काम केले. त्यामुळे या उत्सवाचा मूळ उद्देश सामाजिक एकोपा, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि समाजप्रबोधन हा असल्याचेही या निमित्ताने अधोरेखित होत आहे.डीजेच्या वापरावरून निर्माण झालेला वाद पान ४ वर



शासनाकडून वेळेत बिले न मिळाल्यामुळे कंत्राटदार गजानन देवकते, दयानंद हुल्ले यांनी आत्महत्या केली. शासनाच्या निष्क्रीय धोरणाचा निषेध करीत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया नांदेड सेंटर व महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशन शाखा, महाराष्ट्र शासकिय कंत्राटदार फेडरेशन च्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी कंत्राटदार बाबूराव शक्करवार, एस.एस. पळशीकर, अविनाश रावळकर, सुनिल जोशी, ओम वटमे, इंजिनिअर्स असोसिएशनचे इंजि.एम. ए. हकीम, जिल्हाध्यक्ष इंजि. व्ही. व्ही. मामीडवाड, इंजि. प्रविण जाधव, इंजि. विनोद गंदेवाड, इंजि. सोहेल अन्सारी, इंजि. अजय माळवे तसेच सर्व संघटनेचे पदाधिकारी दिसत आहेत.

## समृद्धीवरील दरोडा प्रकरणी सात जणांना अटक

### पाच आरोपी फरार;धाराशिवच्या टोळीचा पर्दाफाश

नाशिक:समृद्धी महामार्गावर सिन्नरजवळ प्रवाशांना मारहाण करून १८ लाखांचा ऐवज लुटल्याप्रकरणी नाशिक ग्रामीण पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत सात संशयित आरोपींना जेरबंद केले. या दरोड्यात एकूण १२ जणांचा सहभाग असल्याचे समोर आले असून पाच आरोपी अद्याप फरार आहेत. ही टोळी धाराशिव जिल्ह्यातील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सिन्नर तालुक्यातील मलढोण-दुशिंगपूर परिसरात दरोडेखोरांनी रस्त्यावर धारदार लोखंडी वस्तू टाकून वाहनांचे टायर फोडले होते. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील एका वकिलाच्या कुटुंबाला मारहाण करून सुमारे १८ लाखांचा ऐवज लुटून दरोडेखोर पसार झाले होते. याप्रकरणी वावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांच्या नेतृत्वाखाली दहा पथके तपासासाठी तैनात करण्यात आली. तांत्रिक विश्लेषणासह परिसरातील मेडिकल दुकाने, हॉटेल्स आणि ग्रामपंचायतींकडील माहिती तपासल्यानंतर पोलिसांच्या हाती महत्त्वाचा धागा लागला.पोलिसांनी तेरखेडा, पाणगाव, खामकरवाडी आणि उमरा परिसरात कोम्बिंग ऑपरेशन राबवून सूत्रधार अशोक शिंदे, अर्जुन पवार यांच्यासह सात जणांना ताब्यात घेतले. गुन्ह्यात वापरलेली दोन वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. फरार पाच आरोपींचा शोध सुरू असून समृद्धी महामार्गावर अशा घटना रोखण्यासाठी बंदोबस्ताची नव्याने आखणी करण्यात येत असल्याचे पोलीस अधीक्षक स्वामी यांनी सांगितले.


## भाजपच्या बैठकीतील जेवनाची एफडीएकडून तपासणी

पुणे:अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर सुरू असलेल्या धडक कारवाईची झलक पुण्यातील भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीतही पाहायला मिळाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक सुरू असतानाच एफडीएच्या पथकाने अचानक बैठकस्थळी दाखल होत पदाधिकाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या जेवणाची तपासणी केली.

स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा केंद्रात भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह पक्षाचे मंत्री, खासदार, आमदार आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीसाठी उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या जेवणाची एफडीएच्या चार कर्मचाऱ्यांनी अचानक तपासणी केली. पथकाने जेवणाचे नमुने घेतल्याची माहिती समोर आली आहे. अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ही तपासणी करण्यात आल्याचे सांगण्यात येते. तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाची सूत्रे हाती घेतल्यानंतर राज्यात पान ४ वर

## राहुल गांधींवर अ‍ॅट्रासिटीचा गुन्हा दाखल

### मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभेनंतरचे शुद्धीकरण विधी प्रकरण



नवी दिल्ली:कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हल्द्वानी येथील सभेनंतर रामलीला मैदानावर करण्यात आलेल्या शुद्धीकरण विधीवरून राजकीय वाद पेटला आहे. या विधीला अस्पृश्यतेशी जोडून टीका केल्याप्रकरणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात हल्द्वानी कोतवाली पोलिसांनी एससी/एसटी अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

श्री राम सेना धर्मार्थ सेवा समितीचे सदस्य अमित कुमार यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. आपण अनुसूचित जाती समाजातील असून, ११ ऑगस्ट रोजी काही सदस्यांसह मैदानाची साफसफाई करून हवन-पूजा केली होती. या उपक्रमाचा जात किंवा अस्पृश्यतेशी कोणताही संबंध नसल्याचा दावा त्यांनी केला. राहुल गांधी यांच्या वक्तव्यामुळे आपली सामाजिक प्रतिष्ठा व सन्मानाला धक्का बसल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. राहुल गांधी यांनी शुद्धीकरणाच्या घटनेवर टीका करताना, शुद्धीकरण म्हणजे अस्पृश्यतेचे दुसरे नाव असल्याचे म्हटले होते. संविधानाने अस्पृश्यता पान ४ वर

## तेलंगणा पोलिसांवर हल्ला करुन पळालेला आरोपी चिखलीत जेरबंद

### पो.नि.कराड यांची धाडसी कारवाई



किनवट/प्रतिनिधी-गोकुळनगर जवळ एका जमावाने तेलंगणा पोलीसावर हल्ला करून हातकडीसह फरार केलेला आरोपी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या अथक प्रयत्नानंतर आज (३१ ऑगस्ट रोजी) हाती लागला आहे. तेलंगणातील बाजार हातनूर पोलिसांच्या गुन्ह्यातील किनवट तालुक्यातील चिखली येथील आरोपी शेख बकर उर्फ जाफर शेख हा ३० ऑगस्ट रोजी पोलीसांच्या ताब्यातून फरार झाला होता. पोलीसांवरील हल्ल्या दरम्यान जमावापासून सुटका करून घेण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक रमेश परशुराम गोकाला यांनी हवेत गोळीबार केला होता.

तेलंगणा राज्याच्या बाजार हातनूर पोलिसांच्या गुन्ह्यातील शेख बकर उर्फ जाफर शेख हा आरोपी मागील दहा महिन्यांपासून गुंगारा देत होता. तेलंगणा पोलीस त्याच्या पिछावरच होती. खबऱ्याकडून माहिती मिळताच बाजार हातनूर पोलिसांनी किनवट गाठून पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्यांशी चर्चा करून किनवट पोलीसांच्या मदतीने करम हॉटेल परिसरात पकडले. त्याच वेळी आरोपी शेख बकरचा भाऊ सोनू शेख ठाण्यात पोहोचला आणि पोलीसांना गुन्ह्याविषयीची माहिती विचारला. त्यानंतर आरोपीला तेलंगणामध्ये घेऊन जात असतांना चिखली परिसरातील महामार्गावरील गोकुळनगर गावाजवळ जमावाने पोलीसांची गाडी अडवून गाडीसह पोलीसांवर हल्ला करून हातकडीसह आरोपीला पळविण्यास मदत केली. जीव वाचवण्यासाठी बाजार हातनूरचे पोलीस उपनिरीक्षक रमेश परशुराम गोकाला यांनी स्वसंरक्षणार्थ हवेत गोळीबार करून किनवट पोलीस ठाणे गाठले. सदर एकूण प्रकरणी फिर्याद दाखल केली. किनवट पोलीसांनी गुन्ह्याची नोंद करुन पोलीस निरीक्षक कराड यांनी चिखली गावात जाऊन फरार आरोपीचा छडा लाऊन आज (३१ ऑगस्ट) शेख बकर यास ताब्यात घेण्यात यश मिळवले. आज दुपारनंतर किनवट न्यायालयात हजर करण्यात येणार असून पुढील प्रक्रिया चालू असेल. तदोपरांत त्यास बाजार हातनूर पोलिसांच्या ताब्यात देण्याची शक्यता व्यक्तविली जात आहे. पोलिसांची प्रचंड कुमक वाढवून अशा गंभीर परिस्थितीत पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी केलेल्या धाडसाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. अटल गुन्हेगारांचे पोलीस निरीक्षक कराड हे कर्दनकाळ आहेत हे चिखलीतून आरोपी ताब्यात घेऊन सिद्ध केले आहे.

## सीजेपीच्या मोर्चाला सुप्रीम परवानगी!

नवी दिल्ली:५ सप्टेंबर रोजी इंडिया गेट ते दिल्ली पोलीस मुख्यालय प्रस्तावित कॉकरोच जनता पार्टीचा (सीजेपी) युवा मोर्चा रोखण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. ब्रिक्स शिखर परिषदेनंतरपर्यंत मोर्चाला स्थगिती देण्याची मागणी होती. मात्र, सध्या अनुचित घटना घडण्याचे ठोस कारण नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी प्रशासनाने कायदा-सुव्यवस्था राखावी, तसेच सर्व पक्षांनी शांततेने आणि कायद्याच्या चौकटीत वागावे, असे निर्देश दिले. याचिकाकर्त्याला केंद्र सरकारसमोर बाजू पान ४ वर

## भागवतांच्या भूमिकेने आश्चर्याचा धक्का!

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना हिंदू समाजाचे संघटन आणि हिंदुत्वाच्या विचाराच्या प्रसारासाठी झाली. गेल्या अनेक दशकांपासून भारतीय राजकारणात संघाची ओळख प्रखर हिंदुत्ववादी संघटना अशीच राहिली आहे. संघाच्या विचारप्रवाहातून भारतीय जनता पक्षाची राजकीय वाटचाल उभी राहिली आणि हिंदुत्व हा भाजपच्या राजकारणाचा प्रमुख आधार बनला. या पार्श्वभूमीवर संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अमेरिकेतील आपल्या भाषणात मांडलेले विविधतेतील एकता, सर्वसमावेशकता आणि भारतातील मुस्लिमांच्या स्थानाबाबतचे विचार निश्चितच आश्चर्याचा धक्का देणारे ठरतात.भागवत यांनी भारतात मुस्लिमांना स्थान नसावे, असे मानणारा हिंदूच राहू शकत नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले. भारताने विविधतेत एकतेचा संदेश जगाला द्यावा, मानवतेला जोडणारा विचार पुढे न्यावा, द्वेषाऐवजी सहअस्तित्व स्वीकारावे, असा त्यांचा सूर होता. या विधानांचे स्वागत करावे की त्याकडे संशयाने पाहावे, हा प्रत्येकाचा अधिकार आहे. मात्र प्रश्न असा आहे की, संघाच्या दीर्घ राजकीय आणि वैचारिक प्रवासाच्या पार्श्वभूमीवर या विधानांकडे पाहिल्यास त्यामध्ये खरोखरच वैचारिक परिवर्तन दिसते आहे का? संघ आणि हिंदुत्वाच्या राजकारणावर टीका करताना विरोधकांनी सातत्याने असा आरोप केला आहे की, हिंदू अस्मितेचे राजकारण उभे करताना मुस्लिम समाजाला 'दुसरा' म्हणून उभे केले गेले. मंदिर-मशीद वाद असो, धार्मिक ध्रुवीकरण असो किंवा निवडणुकांच्या काळातील हिंदू-मुस्लिम राजकारण असो, या प्रश्नांनी भारतीय राजकारणावर मोठा प्रभाव टाकला आहे. अशा वातावरणात हिंदुत्वाच्या प्रमुख वैचारिक केंद्रातूनच जर आता सर्वसमावेशकतेचा आणि मुस्लिमांच्या समान स्थानाचा संदेश दिला जात असेल, तर त्याची दखल घेणे अपरिहार्य ठरते.परंतु केवळ एका भाषणातील विधानावरून विचारधारेत आमूलाग्र परिवर्तन झाले, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. विचारधारा बदलली आहे की; तिची मांडणी बदलली आहे?, हा खरा प्रश्न आहे. कारण संघाच्या बाबतीत गेल्या अनेक वर्षांत मुस्लिम समाजाबाबत विविध भूमिका मांडल्या गेल्या आहेत. काही वेळा संवादाची भाषा दिसली, तर काही वेळा सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या चौकटीत अल्पसंख्याकांकडून विशिष्ट अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. त्यामुळे भागवतांचे सध्याचे विधान हे संघाच्या व्यापक विचारप्रवाहातील सातत्य आहे की नव्या दिशेचा संकेत, हे काळच स्पष्ट करेल. हिंदुत्वाची व्याख्या जर केवळ हिंदूंच्या धार्मिक किंवा सांस्कृतिक वर्चस्वापुरती मर्यादित न ठेवता भारताच्या सर्व नागरिकांना सामावून घेणारी केली जात असेल, तर हा बदल स्वागतार्ह आहे. कारण भारत हा केवळ हिंदूंचा देश नाही, तसेच केवळ मुस्लिमांचा किंवा कोणत्याही एका धर्माचा देशही नाही. भारताची ओळख त्याच्या बहुविधतेत आहे. मंदिराच्या घंटेसोबत मशिदीची अजान, गुरुद्वारातील कीर्तन आणि चर्चमधील प्रार्थना यांचे सहअस्तित्व हीच भारतीय लोकशाहीची खरी ताकद आहे. मात्र येथेच संघ आणि भाजपसमोर खरी कसोटी आहे. भाषणात सर्वसमावेशकतेचा पुरस्कार करणे सोपे आहे; पण तो विचार प्रत्यक्ष सामाजिक आणि राजकीय व्यवहारात उतरवणे कठीण आहे. मुस्लिमांविषयी संशय निर्माण करणारे राजकीय वक्तव्य, धार्मिक ध्रुवीकरणाला खतपाणी घालणारी भाषा किंवा एखाद्या समुदायाला सतत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणारे राजकारण सुरूच राहिले, तर भागवतांच्या विधानांची विश्वासार्हता कमी होईल. शब्दांपेक्षा कृती महत्त्वाची असते. भागवतांनी 'कर्मभूमीशी प्रामाणिक राहा', 'मानवतेची सेवा करा' आणि 'निसर्गाचे रक्षण करा' असेही विचार मांडले. या विचारांचा विस्तार भारतीय समाजजीवनात झाला तर त्याचे निश्चितच स्वागत झाले पाहिजे. मात्र त्यासाठी प्रथम समाजातील धार्मिक अविश्वास कमी करण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत. हिंदुत्वाच्या नावावर जर द्वेष नको असेल, तर मुस्लिमांविषयीच नव्हे तर कोणत्याही समुदायाविषयी तिरस्काराला स्पष्टपणे नकार देण्याची भूमिका सातत्याने दिसली पाहिजे.मोहन भागवतांच्या वक्तव्यामुळे म्हणूनच आश्चर्याचा धक्का बसतो; पण हा धक्का निराशेचा नसून अपेक्षेचा असायला हवा. हिंदुत्वाच्या सर्वात प्रभावशाली संघटनेचा प्रमुख जर विविधतेतील एकतेचा पुरस्कार करीत असेल, तर त्याचे स्वागत करण्यास कोणालाही संकोच असण्याचे कारण नाही. मात्र या नव्या भाषेचे रूपांतर नव्या राजकीय संस्कृतीत होते का, हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे.भारताला आज धर्माच्या नावावर विभागणाऱ्या घोषणांची नव्हे, तर समाजाला जोडणाऱ्या कृतींची गरज आहे. भागवतांच्या भाषणातून खरोखरच संघाच्या विचारविश्वात नवा अध्याय सुरू होत असेल, तर त्याचा सर्वात मोठा पुरावा व्यासपीठावरील भाषणात नव्हे, तर भारतातील सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनात दिसायला हवा. मुस्लिमांविषयीचा संशय कमी होणे, हिंदू-मुस्लिम संबंधांमध्ये विश्वास वाढणे आणि नागरिकत्वाची समान भावना दृढ होणे यातूनच भागवतांच्या या आश्चर्यकारक विधानाचे खरे मूल्यमापन होईल.**

## अक्षरांची साधना करत विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रकाश पेरणाऱ्या ज्ञानयात्री डॉ.मथुताई सावंत

काही शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रम शिकवतात, काही शिक्षक त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी तयार करतात; पण काही मोजके शिक्षक असे असतात, जे विद्यार्थ्यांना जगणे शिकवतात, विचार करायला शिकवतात आणि स्वतःमधील सामर्थ्य ओळखायला शिकवतात. अशा शिक्षकांची निवृत्ती ही त्यांच्या कार्याची समाप्ती नसते, तर त्यांनी घडविलेल्या असंख्य विद्यार्थ्यांच्या रूपाने त्यांच्या कार्याच्या नव्या पर्वाची सुरुवात असते. नांदेडच्या शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक विश्वातील बहुआयामी आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. मथुताई सुरेश सावंत. एक विद्यार्थीप्रिय शिक्षिका, प्राध्यापिका, संशोधन मार्गदर्शक,कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, चरित्रलेखिका, नाटककार, संपादक आणि सामाजिक कार्यकर्त्या अशा अनेक भूमिका त्यांनी समर्थपणे निभावल्या. चार दशकांची त्यांची ज्ञानसाधना आता औपचारिक सेवानिवृत्तीच्या टप्प्यावर आली असली, तरी त्यांनी पेटवलेले ज्ञानदीप पुढील अनेक पिढ्यांच्या वाटा उजळत राहतील.



**प्राथमिक शिक्षिकेपासून प्राध्यापिकेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास :** डॉ. मथुताई सावंत यांच्या वाटचालीतील सर्वांत प्रेरणादायी बाब म्हणजे त्यांनी शिक्षण क्षेत्रात काम करत असतानाच स्वतःचे शिक्षण सातत्याने चालूच ठेवले. डी.एड.नंतर प्राथमिक शिक्षिका म्हणून सुरू झालेल्या प्रवासात त्यांनी बी.ए., एम.ए. (मराठी), बी.एड. आणि पुढे पीएच.डी.पर्यंत मजल मारली. प्रा. भास्कर चंदनशिव यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास या विषयावर त्यांनी संशोधन केले. १९८६ ते २००५ अशी सुमारे वीस वर्षे राजर्षी शाहू विद्यालय, नांदेड येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर मराठीचे अध्यापन केल्यानंतर सप्टेंबर २००५ पासून पीपल्स कॉलेज, नांदेड येथे पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मराठीचे अध्यापन आणि संशोधन मार्गदर्शन करण्याचे कार्य त्यांनी केले. म्हणून त्यांची वाटचाल केवळ शिक्षक ते प्राध्यापक एवढी नाही; ती शिकवता शिकवता स्वतः शिकत राहणाऱ्या एका ज्ञानसाधकाची वाटचाल आहे. विद्यार्थ्यांच्या गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी शिक्षिका डॉ. मथुताई सावंत यांच्यासाठी विद्यार्थी म्हणजे केवळ वर्गातील रोल नंबर नव्हता. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये एखादा सुप्त लेखक, वक्ता, कवी, विचारवंत किंवा कलावंत दडलेला असतो, यावर त्यांचा विश्वास होता. विद्यार्थ्यांमधील साहित्यिक गुणांना वाव मिळावा म्हणून त्यांनी चाहूल आणि फुलोरा यांसारख्या वार्षिक अंकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कथा, कविता आणि लेखनाला व्यासपीठ उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांचे साहित्य संकलित-संपादित करून त्याला व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थी संसद, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, निबंधलेखन, कथाकथन आणि काव्यवाचन अशा विविध उपक्रमांसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविली. शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, शैक्षणिक शुल्क आणि इतर साहित्याच्या माध्यमातून मदतीचा हात देण्याचे कार्यही त्यांच्या सेवेला अधिक मानवी बनवते. त्यांनी शाळांमध्ये लेखक आपल्या भेटीला यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना थेट लेखक-कवींशी संवाद साधण्याची संधी निर्माण केली. शिक्षक म्हणून हा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण पुस्तकातील धडा शिकवण्यापेक्षा त्या धड्यामागील साहित्यविश्व विद्यार्थ्यांसमोर जिवंत करणे ही खरी अध्यापनकला आहे.

**लेखणीला समाजाच्या वेदनेचे भान :** डॉ. मथुताई सावंत यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा भक्कम पैलू म्हणजे त्यांचे साहित्य.कथा, कादंबरी, चरित्र, नाटक, बालसाहित्य, समीक्षा, संशोधन आणि संपादन अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांनी सातत्याने लेखन केले आहे. पाण्यातील पायवाट, राहु-केतू, जिनगानी, समाजशिक्षिका सावित्रीबाई फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, नवरसांची नवलाई, तिची वाटच वेगळी, कथाकार भास्कर चंदनशिव, निवडुंगाची फुलं, पाणबळी, सर्जनाचा शोध, लगीनघाई? मुळीच नाही!, समाज, साहित्य आणि संस्कृती, साहित्यसौरभ, अधोरेखित आणि अक्षरवाटा यांसारख्या त्यांच्या साहित्यकृती त्यांच्या विस्तीर्ण साहित्यविश्वाची साक्ष देतात. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते कल्पनेच्या आभाळात तरंगत नाही; त्याचे पाय मातीमध्ये घट्ट रोवलेले आहेत.मराठवाड्यातील ग्रामीण जीवन, स्त्रियांचे दुःख, सामाजिक विषमता, मानवी नातेसंबंध, राजकारणातील विसंगती, सामान्य माणसाची घुसमट आणि त्याच वेळी संकटांवर मात करण्याची माणसाची जिद्द त्यांच्या साहित्यामधून व्यक्त होत राहते.राहु-केतू ह्या कादंबरीत ग्रामीण राजकारणाचे वास्तव दिसते. जिनगानीमध्ये ग्रामीण स्त्रीजीवनाची वेदना आकार घेते. तिची वाटच वेगळी आणि पाणबळी यांसारख्या कथासंग्रहांतून ग्रामीण जीवनातील स्त्रीच्या संघर्षाचे विविध पदर उलगडतात. त्यांच्या लेखनात वेदना आहे; पण निराशा नाही. प्रश्न आहेत; पण त्या प्रश्नांमधून परिवर्तनाची शक्यता शोधण्याची धडपडही आहे.

**पुरस्कारांनी गौरवलेली साहित्यसाधना :** त्यांच्या साहित्यकृतींना महाराष्ट्रातील अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.'पाण्यातील पायवाटला स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य पुरस्कार, 'राहु-केतूला महाराष्ट्र शासनाचा अण्णाभाऊ साठे पुरस्कार, नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार, फुले-आंबेडकरवादी साहित्य पुरस्कार आणि बडोद्याचा अभिरुची गौरव साहित्य पुरस्कार अशा विविध सन्मानांनी गौरविण्यात आले.विशेषतः तिची वाटच वेगळी या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती राज्य पुरस्कारासह विविध संस्थांचे अनेक प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाले. त्यांच्या इतर साहित्यकृती आणि समग्र साहित्यिक योगदानालाही राज्यभरातील विविध संस्थांनी गौरविले आहे.मात्र पुरस्कारांची संख्या ही त्यांच्या कार्याची खरी उंची नाही. वाचकाच्या मनात प्रश्न निर्माण करणे, उपेक्षित माणसाच्या वेदनेला शब्द देणे आणि स्त्रीच्या संघर्षाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणणे, हा त्यांच्या लेखणीला मिळालेला सर्वांत मोठा पुरस्कार आहे. साहित्यनिर्मितीबरोबर साहित्यचळवळ स्वतः लिहिणारा लेखक महत्त्वाचा असतो; पण इतरांनाही लिहिते करणारा लेखक अधिक महत्त्वाचा ठरतो. डॉ. मथुताई सावंत यांनी अनेक वर्षे साहित्य संजीवन या वार्षिकाच्या संपादक म्हणून नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. कथा, कविता आणि लेख महाराष्ट्रासह विविध ठिकाणच्या नियतकालिकांत प्रकाशित झाले. दूरदर्शनवर त्यांचे काव्यवाचन झाले, तर आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरून कथा, कविता, मुलाखती आणि भाषणे प्रसारित झाली.साहित्य संमेलने, परिसंवाद, चर्चासत्रे, पुस्तक प्रकाशन सोहळे आणि साहित्यिक स्पर्धांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. साहित्यविश्वातील नव्या प्रतिभेला संधी देण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे त्या केवळ लेखिका न राहता साहित्यचळवळीतील कार्यकर्त्या बनल्या.

**संशोधक आणि संशोधन मार्गदर्शक :** पीएच.डी. प्राप्त करून स्वतः संशोधन करण्यापुरती त्यांची संशोधनयात्रा मर्यादित राहिली नाही. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत संशोधन मार्गदर्शक म्हणून त्यांनी संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विविध विद्यापीठीय जबाबदाऱ्या, परीक्षा, अभ्यासक्रम आणि शैक्षणिक चर्चासत्रांमध्येही त्यांनी योगदान दिले.घरामध्ये सुमारे चार हजार पुस्तकांचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह निर्माण करून सातत्याने स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवण्याची त्यांची धडपड विशेष उल्लेखनीय आहे. ही बाब शिक्षकांसाठीही एक संदेश देते, चांगला शिक्षक तोच, जो आयुष्यभर विद्यार्थी असतो.

**वर्गखोलीच्या पलीकडची समाजशिक्षिका :** डॉ. मथुताई सावंत यांचे कार्य वर्गखोलीच्या चार भिंतींपुरते कधीच मर्यादित राहिले नाही.महिला आणि विद्यार्थिनींच्या प्रश्नांपासून ग्रामीण भागातील सामाजिक कार्यासाठी त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. महिला तक्रार निवारण व विद्यार्थिनी समुपदेशन, कौटुंबिक समस्या निवारण, महिला-बालकल्याण, ग्रामीण महिलांमध्ये जनजागृती, गरजू विद्यार्थ्यांना मदत अशा अनेक क्षेत्रांशी त्यांचा संबंध राहिला.त्यांच्या सामाजिक योगदानासाठी महाराष्ट्र शासनाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, प्रियदर्शिनी पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार यांसह विविध सन्मान त्यांना प्राप्त झाले. मध्ये संध्याताई फाउंडेशनतर्फे त्यांना साहित्यरत्न पुरस्कार देऊनही गौरविण्यात आले. साहित्यिक संवेदनशीलता जेव्हा प्रत्यक्ष सामाजिक कार्यात उतरते, तेव्हा लेखकाचे व्यक्तिमत्त्व अधिक उन्नत होते. डॉ. मथुताई सावंत यांच्या बाबतीत साहित्य आणि समाजकार्य यांचे हे नाते प्रकर्षाने जाणवते.

प्रकाश गिरे पाटील
नांदेड.

**दोन साहित्ययात्रींचे सहजीवन:डॉ.मथुताई आणि डॉ.सुरेश सावंत :** डॉ.मथुताई सावंत यांच्या साहित्यिक प्रवासाचा विचार करताना डॉ. सुरेश सावंत यांचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. सावंत दांपत्याने आपले आयुष्य अक्षरशः शिक्षण आणि साहित्यसेवेला वाहून घेतले आहे. डॉ. सुरेश सावंत हे महाराष्ट्रातील मान्यवर लेखक, शिक्षणतज्ज्ञ आणि विशेषतः बालसाहित्याच्या क्षेत्रातील महत्त्वाचे नाव आहे. त्यांच्या आभाळमाया या बालकवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. कथा, कविता, चरित्र, समीक्षा, संशोधन, संपादन आणि विशेषतः बालसाहित्याच्या माध्यमातून त्यांनी स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण केली आहे. एका घरात दोन लेखक असणे ही केवळ योगायोगाची गोष्ट नाही; त्या घरात सतत पुस्तकांची, विचारांची, विद्यार्थ्यांची, साहित्याची आणि समाजाची चर्चा होत राहणे ही एक समृद्ध सांस्कृतिक परंपरा असते.डॉ. मथुताई सावंत आणि डॉ. सुरेश सावंत हे दांपत्य म्हणजे दोन स्वतंत्र साहित्यप्रवाह एकाच मूल्यनिष्ठ ध्येयाकडे वाहत राहिल्याचे सुंदर उदाहरण आहे.एकीकडे बालमनाला शब्द देणारे डॉ. सुरेश सावंत आणि दुसरीकडे ग्रामीण जीवन, स्त्रीवेदना, समाजवास्तव आणि मानवी मूल्यांना अभिव्यक्त करणाऱ्या डॉ. मथुताई सावंत या दोघांच्या कार्यामुळे सावंत परिवाराने महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात स्वतःची स्वतंत्र अक्षरमुद्रा उमटवली आहे.

**वाचन चळवळीसाठी समर्पित आयुष्य :** आजचे युग प्रचंड वेगाने बदलत आहे. हातात मोबाईल आला. माहितीचा महासागर एका क्लिकवर उपलब्ध झाला; पण या वेगात शांतपणे बसून पुस्तक वाचण्याची सवय मात्र कमी होत चालल्याची चिंता सातत्याने व्यक्त केली जाते. माहिती वाढत असताना चिंतन कमी होत आहे आणि तंत्रज्ञान वाढत असताना पुस्तकांशी असलेली मैत्री तुटू लागली आहे, हे आजच्या समाजासमोरील मोठे सांस्कृतिक आव्हान आहे. अशा काळात सावंत दांपत्याचे वाचनसंस्कृतीसाठीचे कार्य अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांनी वाचनासाठी केवळ उपदेश केला नाही; तर स्वतः वाचत, लिहीत, विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरित करत आणि साहित्यिक-सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून पुस्तक व माणूस यांच्यातील नाते दृढ करण्याचा प्रयत्न केला. वाचनसंस्कृती ही केवळ भाषणांतून निर्माण होत नाही; ती कृतीतून रुजवावी लागते. सावंत दांपत्याने हेच काम अतिशय शांतपणे केले आहे आणि करत आहेत. त्यांच्या कार्यामध्ये प्रसिद्धीचा गजर कमी आणि साहित्यनिष्ठेचा स्वर अधिक आहे. कोणत्याही मोठ्या घोषणेशिवाय पुस्तकांविषयी प्रेम निर्माण करणे, नव्या पिढीला वाचनाकडे वळवणे, लेखक-वाचकांमधील संवाद वाढवणे आणि साहित्यिक संस्थात्मक कार्याच्या माध्यमातून वाचनसंस्कृती टिकवण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची अनमोल अक्षरवाटाचे कार्य आहे.

**वाट हरवलेल्या पिढीसाठी पुस्तकांचा प्रकाश :** आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस अनेकदा स्वतःपासूनच दूर जातो. यशाची स्पर्धा, तंत्रज्ञानाचे आकर्षण आणि सतत बदलणाऱ्या जगामध्ये मनाला स्थैर्य देणाऱ्या मूल्यांची गरज अधिक तीव्र होत आहे. अशा वेळी पुस्तक हे केवळ मनोरंजनाचे साधन राहत नाही; ते माणसाचे मित्र, मार्गदर्शक आणि कधी कधी आयुष्याला नवी दिशा देणारे माध्यम ठरते.म्हणूनच सावंत दांपत्याने वाचनसंस्कृतीच्या विकासासाठी केलेले कार्य हे केवळ साहित्य क्षेत्रापुरते मर्यादित नाही. ते माणूस घडविण्याचे कार्य आहे. एखाद्या विद्यार्थ्याच्या हातात योग्य वयात योग्य पुस्तक पडले, एखाद्या तरुणाला एखाद्या पुस्तकातून आयुष्याची दिशा सापडली किंवा एखाद्या वाचकाच्या मनात साहित्यामुळे संवेदनशीलता जागी झाली, तर त्यामागे वाचनसंस्कृती जिवंत ठेवणाऱ्या अशा निःशब्द कार्यकर्त्यांचे योगदान असते.

**पुरस्कार आले;पण पाय जमिनीवरच राहिले :** साहित्यविश्वानेही सावंत दांपत्याच्या योगदानाची वेळोवेळी दखल घेतली. त्यांच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक योगदानाचा विविध पुरस्कार-सन्मानांच्या माध्यमातून गौरव झाला. मात्र पुरस्कार हा कार्याचा अंतिम मुक्काम न मानता, समाजाने दिलेली जबाबदारी म्हणून स्वीकारण्याची त्यांची वृत्ती विशेष उल्लेखनीय आहे. पुरस्कारांनी त्यांची उंची वाढवली असे म्हणण्यापेक्षा त्यांच्या कार्यामुळे पुरस्कारांची प्रतिष्ठा वाढली, असे म्हणणे अधिक समर्पक ठरेल. सन्मान मिळाल्यानंतरही प्रसिद्धीच्या झगमगाटात न हरवता, अत्यंत साधेपणाने आणि शांतपणे आपली साहित्यसाधना सुरू ठेवणे हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी श्रीमंती आहे.त्यांनी मिळालेला गौरव स्वतःपुरता न ठेवता समाजाप्रति, साहित्याप्रति आणि वाचकांप्रति कृतज्ञतेने समर्पित केला. त्यामुळे त्यांची साहित्यसेवा ही वैयक्तिक यशाची कहाणी न राहता एका सामाजिक-सांस्कृतिक बांधिलकीची चळवळ ठरते.

**एका घरातून सुरू असलेली अक्षरांची चळवळ :** सावंत दांपत्याकडे पाहताना एक सुंदर विचार मनात येतो, 'ज्या घरात पुस्तके जगतात, त्या घरातून संस्कार समाजात प्रवाहित होत राहतात.डॉ. सुरेश सावंत यांनी बालसाहित्याच्या माध्यमातून बालमनाशी संवाद साधला; तर डॉ. मथुताई सावंत यांनी अध्यापन, संशोधन, लेखन आणि विद्यार्थ्यांशी असलेल्या जिव्हाळ्यातून संवेदनशीलतेची पेरणी केली. या दोघांच्या कार्याची दिशा वेगवेगळी दिसली तरी अंतिम ध्येय एकच आहे, वाचनशील, विचारशील, संवेदनशील आणि संस्कारित समाजाची निर्मिती. हेच सावंत दांपत्याच्या सहजीवनाचे सर्वात सुंदर वैशिष्ट्य आहे. संसार आणि साहित्य, कुटुंब आणि सामाजिक बांधिलकी, लेखन आणि वाचन चळवळ या सर्वांचा सुंदर समन्वय त्यांच्या आयुष्यात दिसतो. म्हणूनच त्यांचे सहजीवन नव्या पिढीतील साहित्यिक, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे.

**सेवानिवृत्ती म्हणजे पूर्णविराम नव्हे... :** ३१ ऑगस्ट २०२६ रोजी डॉ. मथुताई सावंत आपल्या औपचारिक शैक्षणिक सेवेतून निवृत्त होत आहेत. पण अशा व्यक्ती खरोखर निवृत्त होतात का? महाविद्यालयातील तासिका थांबेल; पण त्यांच्या विचारांची तासिका सुरूच राहील.हजेरीपटावरची सही थांबेल; पण त्यांनी घडवलेल्या विद्यार्थ्यांच्या मनावर उमटलेली सही कधीच पुसली जाणार नाही. वर्गातील फळ्यावर लिहिणारा खडू थांबेल; पण त्यांच्या लेखणीने समाजाच्या मनःपटलावर कोरलेली अक्षरे कायम राहतील. कारण शिक्षकाच्या आयुष्याची खरी मोजणी त्याने किती वर्षे नोकरी केली यात होत नाही; त्याने किती आयुष्यांना दिशा दिली, किती विद्यार्थ्यांना आत्मविश्वास दिला आणि किती मनांमध्ये ज्ञानाची ज्योत पेटवली, यात होते. डॉ. मथुताई सावंत यांनी शिक्षणातून विद्यार्थी घडवले, लेखणीतून समाजमन जागवले, संशोधनातून ज्ञानाची वाट समृद्ध केली आणि सामाजिक कार्यातून संवेदनशीलतेला कृतीची जोड दिली. म्हणून त्यांच्या सेवापूर्तीच्या या क्षणी एवढेच म्हणावेसे वाटते, त्या महाविद्यालयाच्या सेवेतून निवृत्त होत आहेत; ज्ञानातून नाही.त्या वर्गखोलीतून बाहेर पडत आहेत; विद्यार्थ्यांच्या मनातून नाही.त्या पदावरून निवृत्त होत आहेत; पण साहित्य-संस्कृतीच्या जबाबदारीतून नाही.त्यांच्या हातातील अध्यापनाचा खडू आता औपचारिकरीत्या खाली ठेवला जाईल; पण त्यांच्या हातातील लेखणी अधिक मुक्तपणे चालत राहील, याची खात्री आहे. मराठी साहित्याला अजून अनेक कथा, कादंबऱ्या, समीक्षा आणि वैचारिक लेखन त्यांच्या लेखणीतून लाभो; नव्या पिढीतील लेखकांना त्यांचे मार्गदर्शन लाभो आणि त्यांच्या ज्ञानसाधनेचा प्रकाश असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देत राहो, हीच त्यांच्या सेवापूर्तीच्या निमित्ताने मनःपूर्वक सदिच्छा! डॉ. मथुताई सावंत यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला मनःपूर्वक सलाम आणि त्यांच्या पुढील अक्षरयात्रेला अनंत शुभेच्छा!

## बहाद्दरपुरा येथे ग्रामसभा उत्साहात संपन्न

कंधार/प्रतिनिधी-बहाद्दरपुरा येथे ग्रामपंचायतीची सर्वसाधारण ग्रामसभा दि.२९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता माजी सरपंच तथा प्रशासक सुमनबाई खरात यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण आणि शांततामय वातावरणात संपन्न झाली. यावेळी संपर्कप्रमुख म्हणुन जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पानभोसीचे केंद्रप्रमुख पी. एस. मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामसभेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, ग्रामपंचायत अधिकारी राज्य संघटनेने विविध कारणास्तव व जळगाव जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत अधिकारी श्री पी. एन. पाटील यांचा ग्राम सभा चालू असताना दुर्दैवी निधन झाल्या कारणाने ग्रामसभेच्या सचिवपदाच्या कामकाजावर बहिष्कार टाकल्याच्या पार्श्वभूमीवर, ग्रामसभा नियमितपणे पार पाडण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी रविंद्र कदम (लिपिक) यांच्याकडे सचिवपदाची तात्पुरती जबाबदारी सोपविण्यात आली होती. प्रशासक तथा माजी सरपंच सुमनबाई खरात यांनी शासकीय नियम व प्रशासकीय प्रक्रियेचे पालन करून ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. ग्रामसभेची सुरुवात वंदे मातरम्‌ या गीताने करण्यात आली. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण-आवास प्लस २०२४ सर्वेक्षणातील कायमस्वरूपी प्रतीक्षा यादीचे वाचन करण्यात आले व यादीतील पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आली तसेच मागील ग्रामसभेच्या इतिवृत्ताचे वाचन करून विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सचिवपदाची तात्पुरती धुरा सांभाळणारे ग्रामपंचायत कर्मचारी रविंद्र कदम यांनी सभेतील विषयांचे प्रभावीपणे सादरीकरण केले. ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना समर्पक उत्तरे देत त्यांनी ग्रामसभेचे कामकाज शिस्तबद्ध व सुरळीतपणे पार पाडले. प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी अत्यंत कौशल्याने पार पाडल्याबद्दल प्रशासक, ग्रामपंचायत प्रशासकीय समितीचे सदस्य तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थांनी रविंद्र कदम यांचे विशेष कौतुक केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२११९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# ना...वारा,ना...पाऊस...दिवसभरात पंचवीस ते तीस वेळा वीज गुल

## आमदारांनी विधानसभेत प्रश्न मांडूनही कारभाराला शॉक बसेना...!

देगलूर/प्रतिनिधी-ना... वादळ...ना....विजेचा कडकडाट... ना...मुसळधार पाऊसतरीही देगलूर शहर व परिसरात वारंवार वीज गुल होण्याचा प्रकार सुरूच आहे. महावितरणच्या या ढिसाळ कारभारामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले असून आ.जितेश अंतापूरकर यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे. वीज बिल वसुलीला वेग पण वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी यंत्रणा संथ, अशी संतप्त प्रतिक्रिया शहरवासीयांतून उमटत आहे.

पावसाळ्याचे दिवस असल्याने अधूनमधून वीजपुरवठा खंडित होणे स्वाभाविक मानले जाऊ शकते. मात्र सध्या कोणतीही मोठी नैसर्गिक आपत्ती नसतानाही देगलूर शहरात वारंवार वीज गायब होण्याचे प्रकार सुरू आहेत. काही भागांत तर दिवसभरात अनेक वेळा वीज ये-जा करत असल्याने घरगुती ग्राहकांसह व्यापारी, विद्यार्थी, छोटे व्यावसायिक आणि ज्येष्ठ नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

महात्मा फुले देगाव रोड परिसरातील डीपी क्रमांक ७१ अंतर्गत येणाऱ्या भागात दिवसातून तब्बल वीस ते पंचवीस वेळा वीज पुरवठा खंडित होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. वारंवार वीज जाण्यामुळे घरातील विद्युत उपकरणांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नळाला पाणी आल्यानंतर विद्युत मोटारीद्वारे पाणी भरणेही अवघड होत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. यासह रात्रीच्या वेळी वीज गायब झाल्यास घरांमध्ये उकाडा आणि डासांचा त्रास सहन करावा लागतो. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील इतर भागांतही अशाच प्रकारे वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

देगलूर शहरातील वीजपुरवठ्याच्या प्रश्नाची आ.जितेश अंतापूरकर यांनी विधानसभेत दखल घेत हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे आता तरी महावितरणच्या यंत्रणेत सुधारणा होईल अशी अपेक्षा नागरिकांना होती. मात्र, त्यानंतरही वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार सुरू असल्याने विधानसभेतील आवाजही महावितरणच्या कार्यालयाच्या भिंतीपलीकडे पोहोचला नाही काय? असा उपरोधिक सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

### फ्युज कॉलवरच कायम व्यस्तचा बोर्ड..!

वीजपुरवठा खंडित झाल्यास तक्रार नोंदविण्यासाठी फ्युज कॉलवर संपर्क साधण्याचे आवाहन महावितरणकडून केले जाते. मात्र, नागरिकांनी या क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो अनेकदा व्यस्त असल्याची तक्रार आहे. तक्रार करण्यासाठी दिलेला क्रमांकच सतत व्यस्त राहत असेल तर ग्राहकांनी आपली समस्या मांडायची तरी कुठे? फ्युज कॉल हा समस्या सोडविण्याचा मार्ग की नागरिकांच्या संयमाचा फ्युज उडविण्याची व्यवस्था? असा सवाल संतप्त नागरिकांतून केला जात आहे..

### वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्राउंड रिपोर्ट घ्यावा

देगलूर शहरातील वीजपुरवठ्याची वस्तुस्थिती कार्यालयात बसून नव्हे तर प्रत्यक्ष भागात जाऊन तपासण्याची वेळ आली आहे. वारंवार वीज खंडित होणाऱ्या भागांची यादी तयार करून त्यामागील तांत्रिक कारणे शोधावीत. फ्युज कॉलवरील तक्रारींची नोंद, त्यावरील कार्यवाही आणि तक्रार निकाली काढण्यासाठी लागणारा वेळ याचेही परीक्षण करावे.

नागरिकांकडून वेळेवर वीजबिलाची अपेक्षा असेल, तर महावितरणकडूनही वेळेवर आणि सुरळीत वीजपुरवठ्याची अपेक्षा रास्त आहे. त्यामुळे जिल्हास्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देगलूरच्या वीजपुरवठ्याच्या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात कडक सूचना द्याव्यात अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

## लोहा येथे एक लाखाची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-लोहा शहरातील गोल्डन सिटी येथे एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी एक लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

राम माधवराव दाडगे (वय ४९), रा.गोल्डन सिटी, लोहा हे घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले असता शनिवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा एक लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. राम दाडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लोहा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आस्थापनांमध्ये केवळ व्यावसायिक एलपीजी गॅसचा वापर बंधनकारक

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील सर्व मंगल कार्यालये, लॉन, हॉटेल्स तसेच केटरिंग सेवा पुरविणाऱ्या व्यावसायिक आस्थापनांनी स्वयंपाकासाठी व अन्य कामांसाठी केवळ व्यावसायिक (कमर्शियल) एलपीजी गॅस सिलिंडरचाच वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासंदर्भात संबंधित आस्थापनांच्या स्वयंपाकघराच्या दर्शनी भागात व्यावसायिक गॅसच्या वापराबाबत स्पष्ट सूचना फलक लावण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात आले आहेत. प्रत्येक मंगल कार्यालय, लॉन, हॉटेल आणि केटरिंग सेवा पुरवठादाराने आपल्या स्वयंपाकघराच्या दर्शनी भागात येथे केवळ व्यावसायिक गॅस सिलिंडरचाच वापर केला जाईल. घरगुती गॅसचा वापर करणे कायद्याने गुन्हा आहे. असा स्पष्ट आणि ठळक सूचना फलक लावणे आवश्यक आहे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## पीपल्स हायस्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात साजरा



नांदेड/प्रतिनिधी-हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त पीपल्स हायस्कूल, नांदेड येथे राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण व्हावी आणि खेळाचे महत्त्व अधोरेखित व्हावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष नौनिहालसिंघ जहागीरदार होते. पीपल्स महाविद्यालयाचे प्राचार्य विकास सुकाळे यांची विशेष उपस्थिती होती. नांदेडचे प्रसिद्ध हॉकीपटू प्रा. डॉ. सरदार जुझारसिंग सिलेदार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ. सिलेदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकासासोबतच अनेक संधी उपलब्ध होतात, असे सांगितले. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून विद्यार्थी देशाचे नाव उंचावू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबदल्याचा विचार न करता आवडीच्या खेळात सहभागी व्हावे. मेहनत, शिस्त, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात यश संपादन करता येते, असे त्यांनी नमूद केले. विविध खेळाडूंची उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. प्राचार्य विकास सुकाळे यांनीही विद्यार्थ्यांना खेळाबरोबरच शिक्षणाला महत्त्व देण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात नौनिहालसिंघ जहागीरदार यांनी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच क्रीडा कौशल्य विकसित करून विविध स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे सांगितले. सौ. बच्चेवार व श्रीमती कंधारे यांनीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. यावेळी आवटे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पालेपवाड यांनी केले, तर फुलारी यांनी आभार मानले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेती वाहतूक करणारा हायवा पोलीसांनी पकडला

नांदेड/प्रतिनिधी-मारतळा ते नायगाव रोडवरील वाका फाटा येथे शनिवारी रात्री अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा उस्माननगर पोलीसांनी पकडला असून याप्रकरणी वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी महेश मुळीक व पोलीस कर्मचारी शनिवारी रात्री गस्त घालीत असतांना वाका फाटा येथे रेती घेवून जाणारा हायवा क्र.एमएच १७ बीवाय-२६८५ पोलीसांनी थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये पाच ब्रास रेतीचा साठा आढळून आला. पोलीसांनी हायवा व रेती असा ३० लाख १६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात कृष्णा शिवाजी जाधव रा.उमरा व अन्य एका जणाविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.


### जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायालय कनीष्ठ स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
दि.कि.अर्ज (आर.जे.ई) क्र.१२९९/२०२६
चंद्रकांत गोजे व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. चंद्रकांत पि.रघुनाथराव गोजे, वय : ६८ वर्ष, व्यवसाय-व्यापार, रा.घर क्र.१-८-९११, रघुचंद्र गणेश नगर, प्लॉट क्र.१,नांदेड. मो.८६६८७११३७०, २. प्रणोती भ्र.अमेय भावसार, वय : ३६ वर्ष, व्यवसाय : गृहिणी, रा.राजहंस प्लॉट क्र.३३२, सेक्टर नं.२४, सेंट्रल बँक ऑफ इंडीया जवळ, प्राधिकरण, निगडी, व्ही.टी.सी.पुणे सिटी, ३. तेजस पि.चंद्रकांत गोजे, वय : ३१ वर्ष व्यवसाय : व्यापार, रा.घर क्र.१-८-९११, रघुचंद्र गणेशनगर, प्लॉट क्र.१ नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र (Herships certificate) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. मयत विद्या भ्र.चंद्रकांत गोजे यांचे अर्जदार क्र.१ हा पती, अर्जदार क्र.२ ही मुलगी व अर्जदार क्र.३ हा मुलगा आहे. मयत विद्या भ्र.चंद्रकांत गोजे यांचा मृत्यु दि.२५.०५.२०२६ रोजी झाला.

वर नमुद अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदारांनी अर्जात कथन केले आहे. अर्जदारांनी मा. न्यायालयात अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दि.०१.१०.२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २९/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर,नांदेड



### जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायालय क.स्तर लोहा ता.लोहा जि.नांदेड
मा.श्रीमती पी.व्ही.चिद्रे यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७०/२०२६
गणपती कदम वगैरे - विरुद्ध - निरंक

अर्जदार : १) गणपती पंढरी कदम वय ३६ वर्षे धंदा शेती रा. हातनी ता.लोहा जि.नांदेड, २) शशिकला भ्र.भुजंग शिंदे/शशिकला पि.पंढरी कदम वय ३१ वर्षे धंदा घरकाम रा.गुंडा ता.कंधार जि.नांदेड, ३) उषा भ्र.गोविंद साळवे/उषा पि.पंढरी कदम वय २७ वर्षे धंदा घरकाम रा.धनज (खु.) ता.लोहा जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये मयत पंढरी मानिकराव कदम यांचे अर्जदार हे वारस असल्याचे घोषीत करुन वारसा प्रमाणपत्र देणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एम.बी.वाखरडे यांच्या मार्फत अर्ज केला आहे.

हे की, मयत नामे पंढरी मानिकराव कदम हे दिनांक १५/०६/२०२६ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ हा मयताचा मुलगा व अर्जदार क्र.२ ते ३ ह्या मयताची मुलगी आहे. मयतास अर्जदारा शिवाय इतर कोणीही दुसरे कायदेशीर वारस नाहीत.

हे की, अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत तसेच अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे, वारसाहक्क प्रमाणपत्र (Legal Hership certificate) मिळणेसाठी अर्जदारांनी अर्ज केला आहे.

तरी अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र (Legal Hership certificate) देणे बाबत कोणास काही आक्षेप, उजर किंवा हरकत असेल तर ते त्यांनी दिनांक ३०/०९/२०२६ रोजी पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत उपस्थित राहुन लेखी आक्षेप सादर करावा, अन्यथा पुढील आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक २४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर,लोहा



### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२३७/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२७/८/२०२६

#### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मोहम्मद फारुख पि.मोहम्मद अय्युब खुरेशी** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६५६/९७ गट क्र.६६२ प्लॉट क्र.९७** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **फौजीया फिरदोस भ्र.शेख मुखीत** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १८५१/२०२५ दि.१२-९-२०२५, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- २५ फूट रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.९६, उत्तरेस :- प्लॉट क्र.९९, दक्षिणेस :- प्लॉट क्र.९५

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



### जात वैधता प्रमाणपत्र हरवले आहे

मुनेश्वर रोहित शिवप्रसाद रा.पिवळी गिरणी,नांदेड या नावाचे अनुसुचित जाती प्रवर्गातील नवबौद्ध हे जात वैधता प्रमाणपत्र व काही कागदपत्र गणेशनगर ते बसस्टॅण्ड दरम्यान ऑटो प्रवासात हरवले आहे. कृपया कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता
**रोहित शिवप्रसाद मुनेश्वर**
रा.पिवळी गिरणी,गणेशनगर, वाय पॉईंट जवळ,नांदेड.
मो.नं.८७९३७६१८२०



### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२३३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२७/८/२०२६

#### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मनिषा भ्र.केशव शहापुरे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५१०/६-R गट क्र.५१० प्लॉट क्र.६-R** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **शिवशंकर पि.भाऊराव पिंपळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १/६६३५/२०२६ दि.२७.६.२०२६, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- २० फूट रस्ता, पश्चिमेस :- सदर गटाचा भाग, उत्तरेस :- प्लॉट क्र.५-R, दक्षिणेस :- प्लॉट क्र.७-R

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२३४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२७/८/२०२६

#### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **आरबाज अय्युब नदाफ** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६५६/१०० गट क्र.६६२ प्लॉट क्र.१००** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मोहम्मद अकबर पि.मोहम्मद अशफाख** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २३३६/२०२६ दि.१०.८.२०२६, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.१०१ आहे, पश्चिमेस :- २५ फूट रुंद रस्ता, उत्तरेस :- कॅनाल रोड आहे, दक्षिणेस :- प्लॉट क्र.९८ आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२३५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२७/८/२०२६

#### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शेख मतीन पि.शेख मुनीर तांबोळी, मिर्झा शफी बेग उस्मान बेग** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **-- गट क्र.६७५ प्लॉट क्र.४३** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **१) इरफान इसाक खुरेशी, २) इमरान इसाक खुरेशी** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १८०४/२०२५ दि.४.९.२०२५, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नुरकॉलनी नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.४२, पश्चिमेस :- प्लॉट क्र.४४, उत्तरेस :- गट क्र.६७६, दक्षिणेस :- ९ मिटर रुंद रोड

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२३६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२७/८/२०२६

#### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **हनुमंता माणिका नवले** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **९२८ गट क्र.गावठाण प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मयत नामे माणिका भिकाजी नवले** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- मा.न्यायालयाचे वारसा पत्र, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- बोळ, पश्चिमेस :- गंगाधर तुकाराम नवले यांचे घर, उत्तरेस :- रस्ता, दक्षिणेस :- सुभाषराव नागोराव नवले यांचे घर

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# लाखो रुपयांची अनामत उचल;नऊ संचालकांना नोटिसा

## किनवट बाजार समितीच्या कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह

किनवट/प्रतिनिधी-बहूचर्चीत झालेली किनवट कृषी उत्पन्न बाजार समिती ही आर्थिक घोटाळ्याच्या आरोप-प्रत्यारोपाच्या गुंतागुंतीतून बाहेर पडताना दिसत नाही. ५ जूनच्या पणन संचालकांच्या संदर्भीय पत्राचा हवाला देत रेखांकित केलेल्या मुद्यानुसार चौकशीकामी बाजार समितीच्या अभिलेखांचे अवलोकन केले असता त्या संचालकांच्या नावे अनामत रक्कम उचल केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यावरून रक्कम उचल करण्याचे प्रयोजन आणि अधिकार आहेत का? असा गंभीर मुद्दा उल्लेखित करून चौकशी पथक सदस्य सचिव डी.जी.गायकवाड यांनी नऊ संचालकांना २५ ऑगस्ट रोजीच नोटीसा बजावल्या. तीन दिवसांच्या आत समक्ष उपस्थित राहून लेखी खुलासा सादर करण्याची संधी दिलीय.

राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, किनवट यांच्या कार्यालयामार्फत किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील अभिलेखांची तपासणी करण्यात आली. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० (अ) व (ब) तसेच नियम ११७ अन्वये पणन संचालक, पुणे यांच्या आदेशानुसार ही चौकशी सुरु आहे. दरम्यान चौकशी पथकाने बाजार समितीच्या दप्तराची पाहणी केली, तेव्हा अनेक संचालकांनी कायदे आणि नियमांना पायदळी तुडवून बाजार समितीच्या तिजोरीतून लाखोंची 'अनामत' रक्कम उचल केल्याचे सक्रुतदर्शनी दिसत असल्याने केवळ तीन दिवस अवधीच्या नोटीसा बजावल्याचे सूत्रांद्वारे समजते. आजपर्यंत छातीठोकपणे पाक असल्याचे सांगणारांवरच अनामत रक्कमा उचल केल्याचा कलंक लागल्याच्या चर्चेला या नोटीसांमुळे रान मोकळे झाल्याचे दिसते. तथापि हा कलंकीत मुद्दा म्हणजे निष्कर्ष माणता येणार नाही, असाही एक मतप्रवाह ऐकायला मिळतोय. तुर्तास तरी संचालक सोपानराव ज्ञानोबा केंद्रे (पत्र क्र.४४२) ६ लाख रुपये, श्रीराम माणिकराव कांदे (पत्र क्र.४४०) १६ लाख ९५ हजार रुपये, राहुल गेमसिंग नाईक (पत्र क्र.४३९) १४ लाख ७५ हजार रुपये, कैलास अशोक बीज्जमवार (पत्र क्र.४३३) १० लाख ४० हजार रुपये, राजू लक्ष्मण सुरोसे (पत्र क्र.४३८) ९ लाख ९५ हजार रुपये, बालाजी गोविंद बामणे (पत्र क्र.४३७) ९ लाख ९९ हजार रुपये, प्रेमसिंग रामजी जाधव (पत्र क्र.४३६) ८ लाख ९५ हजार रुपये, सुनील लक्ष्मण घुगे (पत्र क्र.४४१) ७ लाख ९५ हजार रुपये, प्रल्हाद तुकाराम सातव (पत्र क्र.४३५) ६ लाख ९५ हजार रुपये अनामत रक्कम उचल केल्याचा ठपका आहे. मात्र विहीत मुदतीत संचालकांनी समाधानकारक खुलास्यात काय सादर केले किंवा नाही हे अद्यापही समजू शकले नाही. अनामत रक्कम उचलण्याचे प्रयोजन काय?, आणि कोणत्या कायद्याने रोख रक्कम अनामत उचल करण्याचे अधिकार आहेत? या बद्दलचा लेखी खुलासा तीन दिवसांच्या आत सहाय्यक निबंधक कार्यालयात समक्ष उपस्थित राहून सादर करण्याचा मुद्दा नमूद आहे. शेवटी पुन्हा पुन्हा एकच मुद्दा समोर येतोय तो म्हणजे दिवसेंदिवस जमिनीचे वाढते भाव लक्षात घेता कवडीमोल भावाने गोकुंदातील जमिन विकण्याचे कारण. बँकेत 'एफडी' करण्यासाठीच घाई केली का?, जमीन विक्री करण्यापूर्वीच्या पत्रातील मुद्दे आणि पणन संचालक प्रशासनाने परवानगी पत्रात दिलेल्या नियम, अटी, शर्थीचे उल्लंघन तर केले नाहीना? यांचीही पत्रे उघडून पहायला पाहिजे. शेतकऱ्यांचा विश्वास गमावलेल्याना पुन्हा शेतकऱ्यांकडे मतांचा जोगवा मागायला तोंड राहाणार का?, बाजार समितीची सार्वजनिक संपत्ती स्वतःची समजून जी आर्थिक वाताहात केलीय. शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी गेले अन्‍ मालक होऊन मनमर्जीने रक्कमेचा चुराडा केलाय हे मात्र उल्लेखनीय आहे.

# हावरगा येथे जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड;सात जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील हावरगा येथे सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर रविवारी पोलीसांनी धाड टाकुन सात जणांना अटक केली. त्यांच्या जवळून २ लाख रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला.

हावरगा येथे जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती देगलूर पोलीसांना मिळाली. प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ, पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांच्या एका पथकाने रविवारी सायंकाळी हावरगा येथील जुगार अड्ड्यावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना पोलीसांनी ज्ञानेश्वर अर्जुन जांभळे (वय ३७) रा.बामणी ता.मुखेड, अनिल माधव गवळवाड (वय ३०) रा.नवीन मुजळगा ता.देगलूर, अशोक यादवराव (वय ३५) रा.नवीन हावरगा, साहेबराव हणमंत ढवळे (वय ३६) रा.नवीन हावरगा, शुद्धोधन उर्फ सिद्धार्थ कांबळे (वय ३२) रा.नवीन मुजळगा, सायलू यादव बरसमवार (वय २८) रा.नवीन हावरगाव, भीमराव विठ्ठलराव बरसमवार (वय ३५) रा.नवीन हावरगा ता.देगलूर यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य, तीन दुचाकी असा २ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुध्द मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नागापूर शिवारातील रेती घाटावर पोलीसांची कारवाई



नांदेड/प्रतिनिधी-मौजे नागापूर शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी पोलीसांनी रविवारी सायंकाळी धाड टाकुन ३३ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

नागापूर शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेतीचा उपसा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली फौजदार व्यंकट कुसमे व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी सायंकाळी रेती घाटावर छापा टाकला. नदीच्या पात्रातून रेती उपसा करणारे तीन ते चार जण पोलीसांना बघून नदी पात्रात उडया मारुन पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरुन दोन लोखंडी बोटी, पाच तराफे, रेती साठा असा ३३ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला. पंचासमक्ष पोलीसांनी लोखंडी बोटी व तराफे घटनास्थळीच जाळून नष्ट केले आहेत.

# धर्माबाद परिसरात हजारो ब्रास रेतीचा अवैध साठा;परवानगी कुणाची?

## महसूल यंत्रणेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरासह तालुक्यातील विविध भागांत हजारो ब्रास रेतीचे अनधिकृत साठे अनेक ठिकाणी करण्यात आले आहेत. रेती तस्करांनी नदीच्या पात्रातून अवैधरित्या रेती उपसा करुन सदर रेती मोकळ्या जागा, शेतशिवार तसेच खासगी भूखंडांवर साठा करुन ठेवली आहे. महसूल व पोलीस प्रशासनाकडून सदरील रेती साठ्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्याने त्यांच्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत.

गोदावरी नदीपात्रातून विनापरवाना रेती उपसा करून हायवा व अन्य वाहनांच्या माध्यमातून रेती रात्रीच्या वेळी विविध ठिकाणी आणून साठवली जात आहे. पावसाळ्यात रेती उपशावर निर्बंध असतानाही हा प्रकार सुरू असल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या अंधारात मोठ्या प्रमाणात रेतीची वाहतूक होत असताना संबंधित यंत्रणेला याची माहिती नाही का, असा सवालही उपस्थित होत आहे. एखाद्या ठिकाणी शेकडो नव्हे तर हजारो ब्रास रेतीचा साठा होत असताना संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी किंवा महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी साठवणूक केलेल्या रेती साठ्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. रेती साठा कोणाचा आहे, तो कुठून आणण्यात आला, त्यासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली आहे का, याची तपासणी प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. मात्र, अद्यापही मोठ्या प्रमाणातील साठ्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक महसूल यंत्रणेच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. अवैध रेती उपसा व साठवणुकीमुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडवीला जात असून त्यामुळे प्रशासनाने केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन रेती साठ्यांची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. संबंधित साठ्यांचा पंचनामा करून रेतीचा स्रोत, प्रमाण आणि मालकी याची चौकशी करण्याची मागणीही करण्यात येत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी व वरिष्ठ खनिकर्म अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन धर्माबाद परिसरातील संशयित रेती साठ्यांची अचानक पाहणी करावी. अनधिकृत साठा आढळल्यास तो जप्त करून संबंधित साठेबाजांवर कठोर कारवाई करावी. तसेच अवैध रेती उपशाला अथवा वाहतुकीला शासकीय पातळीवरून कोणाचे संरक्षण आहे का, याचीही चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कागदावर विकास,प्रत्यक्षात भकास?;७२ लाखांच्या कामांवर नागरिकांचा सवाल

## लांजी ग्रामसभेत गोंधळ,पोलिसांना पाचारण

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यात विकासकामे, स्वच्छता अभियान आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत आघाडीवर असल्याचा लौकिक मिळविणाऱ्या मौजे लांजी ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दि. २९ रोजी झालेल्या ग्रामसभेत तब्बल ७२ लाख रुपयांच्या विकासकामांमध्ये कथित अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करीत नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाला धारेवर धरले. विशेष म्हणजे काही नागरिकांनी कागदपत्रे व इतर पुरावे असल्याचा दावा करीत ग्रामसभेतच प्रश्नांची सरबत्ती केली.

लांजी ग्रामपंचायतीला विविध कामांसाठी पुरस्कार मिळाले असून ग्रामपंचायत इमारतही माहूर तालुक्यात उल्लेखनीय मानली जाते. सरपंच मारुती रेकुलवार हे विकास निधी गावात खेचून आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले जाते. मात्र, ग्रामसभेतील नागरिकांच्या आरोपांमुळे या कथित विकास मॉडेलचीच आता कसोटी लागली आहे. ग्रामसभेत नागरिकांनी विविध विकासकामांबाबत आक्षेप नोंदविले. काही कामे ऑनलाईन नोंदविण्यात आली असून प्रत्यक्षात ती कामे झालेली नसल्याचा दावा नागरिकांनी केला. तसेच नागरिकांकडून वसूल करण्यात आलेला कर ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा झाला नसल्याचेही काही नागरिकांनी आरोप केले. कागदावर विकास आणि प्रत्यक्षात काहीच नाही! असा सवाल करीत नागरिकांनी संबंधित कागदपत्रे व पुरावे ग्रामसभेत मांडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ग्रामसभेतील वातावरण चांगलेच तापले. नागरिकांच्या आरोप-प्रत्यारोपांमुळे ग्रामसभेत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांना पाचारण करावे लागल्याची माहिती आहे. ग्रामसभेचे चित्रीकरण काही नागरिकांनी केले. ग्रामसभेत आपल्याला पुरावे मांडण्याची पुरेशी संधी मिळाली नाही, बोलू दिले नाही, असा आरोप करीत काही नागरिक ग्रामपंचायतीबाहेर आले. त्यानंतर त्यांनी कथित अनियमिततेशी संबंधित कागदपत्रे व पुरावे दाखवत व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केले. त्यामुळे लांजी ग्रामपंचायतीच्या कारभाराची चर्चा आता गावाच्या चौकातून थेट सोशल मीडियापर्यंत पोहोचली आहे. नागरिकांनी केलेले आरोप गंभीर असल्याने माहूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस आता नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### स्टंटबाजी की, भ्रष्टाचाराची पोलखोल?

लांजी ग्रामपंचायतीच्या विकासकामांबाबत नागरिकांनी केलेले आरोप खरे आहेत की त्यामागे अन्य काही राजकारण आहे, हे अधिकृत चौकशीतच स्पष्ट होणार आहे. मात्र, ७२ लाखांच्या विकासकामांवर नागरिकांनी थेट प्रश्न उपस्थित करून पुरावे असल्याचा दावा केल्याने संशयाचे धुके अधिकच दाटणार आहे. नागरिकांचा आक्षेप केवळ ग्रामसभेतील स्टंटबाजी आहे की खरोखरच विकासकामांच्या नावाखाली झालेल्या कथित गैरप्रकारांची पोलखोल आहे की, ग्रामसभेतील गोंधळ स्टंट बाजी....?, या बाबत शंका कुशंका उपस्थित केल्या जात आहे.




मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरु केले आहे. त्यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ सामाजिक कार्यकर्ते सोपान नेवल पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले असून उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात कार्यकर्त्यांनी रक्तदान करुन जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष मं.र.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१३००/२०२६

अर्जदार : १. कमलबाई रुकमन सारंगे वय ६८ वर्ष धंदा घरकाम रा.पावडेवाडी ता.जि.नांदेड, २. रामबानो रुकमन सारंगे वय ५० वर्ष धंदा व्यापार रा.पावडेवाडी ता.जि.नांदेड, ३. सविता रुकमन सारंगे वय ५२ वर्ष धंदा व्यापार रा.वाडी ता.जि.नांदेड, ४. कोंडीबा रुकमन सारंगे वय ४० वर्ष धंदा व्यापार रा.वाडी ता.जि.नांदेड, ५. रंजना नरोजी राउत वय ४५ वर्ष धंदा घरकाम

विरुध्द

निल

दावा : बॉम्बे रेगूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत रुकमन कोंडनराव सारंगे यांचे वारस आहेत मयत रुकमन कोंडनराव सारंगे यांचा मृत्यू दिनांक १४/०३/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक १५/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क.लिपीक | स्वाक्षरित/- |
| ४ थे सह दिवाणी न्यायालय | स.अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# अँटिलिया प्रकरणी परमबीर सिंहांच्या चौकशी करा

## निवृत्त एसीपी भीमराव घाडगे यांची एनआयए न्यायालयात याचिका

मुंबई/प्रतिनिधी- मुकेश अंबानी यांचे निवासस्थान असलेल्या अँटिलिया प्रकरणात तत्कालीन मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्या भूमिकेचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी निवृत्त सहायक पोलीस आयुक्त भीमराव ऊर्फ भीमराम घाडगे यांनी एनआयएच्या विशेष न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत केली आहे.

उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर स्फोटके ठेवण्याच्या प्रकरणाला नवा ट्विस्ट मिळाला आहे. या प्रकरणात तत्कालीन मुंबई पोलीस आयुक्त परमबिरसिंह यांच्या भूमिकेची चौकशी करावी या मागणीसाठी घाडगे यांनी सायबर तज्ज्ञ ईशान देवेश सिन्हा यांनी २०२१ मध्ये एनआयएकडे दिलेल्या जबाबाचा आधार घेतला आहे. अँटिलिया प्रकरणाची जबाबदारी स्वीकारल्याचा दावा करणाऱ्या जैश-उल-हिंदच्या टेलिग्राम वाहिनीबाबतची माहिती आपण परमबीर सिंह यांना दिली होती, असे सिन्हा यांनी जबाबात सांगितल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.९ मार्च २०२१ रोजी परमबीर सिंह यांची भेट झाल्यानंतर त्यांच्या सांगण्यावरून प्रकरणाशी संबंधित अहवाल तयार केला. मूळ अहवालात अँटिलियाची जबाबदारी स्वीकारणारे पोस्टर नव्हते; मात्र ते पोस्टर अहवालात समाविष्ट करण्यास सांगण्यात आले. यासाठी पाच लाख रुपये मिळाल्याचेही सिन्हा यांनी सांगितल्याचे याचिकेत नमूद आहे.एनआयएने सिन्हा यांचा जबाब नोंदवूनही परमबीर सिंह यांच्या कथित भूमिकेची पुरेशी चौकशी झालेली नाही, असा दावा घाडगे यांनी केला आहे.

# साहित्य विचार परिषदेची नवी कार्यकारणी जाहीर

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड तालुक्यातील कवी, लेखक आणि साहित्यिकांना हक्काचे विचारपीठ मिळावे, या उदात्त हेतूने साहित्य विचार परिषद, तालुका उमरखेड ची नवीन कार्यकारणी सर्वानुमते गठीत करण्यात आली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या विशेष सभेत ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली. या नवनियुक्त कार्यकारणीची धुरा अध्यक्ष सुरेश वाघ, उपाध्यक्ष शारदाताई साहेबराव धात्रक आणि कोषाध्यक्ष नागेश मिराशे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. तसेच कार्यकारणी सदस्य म्हणून राजेश डहाके, आनंद बाबा शिंदे, मुकुंद सुरते, संजय मुटकूळे, सूरज शिंदे यांची निवड करण्यात आली. तर मार्गदर्शक सल्लागार म्हणून प्राचार्य डॉ. वि. ना. कदम, डॉ. रवींद्र चव्हाण आणि भास्करराव काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. वि. ना. कदम यांच्या अध्यक्षतेखाली ही महत्त्वपूर्ण सभा पार पडली. या परिषदेच्या माध्यमातून येत्या सप्टेंबर महिन्यात तालुकास्तरीय भव्य कवी संमेलन आयोजित करण्याचा मानस नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या संमेलनामुळे तालुक्यातील नवोदित व अनुभवी साहित्यिकांना आपली कला सादर करण्याची मोठी संधी मिळणार आहे.सभेच्या शेवटी डॉ. रवींद्र चव्हाण यांनी आभार मानले.

पान १ वरुन

### ३० सप्टेंबरपर्यंत हरकतीची संधी;...

अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्यथा अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट होण्याची संधी गमावली जाऊ शकते. त्यामुळे प्रत्येक मतदाराने आपले नाव प्रारूप यादीत तपासून, नाव नसल्यास निर्धारित मुदतीत दावा दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मराठा बांधवांनो...

त्यांनी केला. त्यानंतर, पोरांनो, आपले मुंबईचे सुरू करा, असे आवाहन त्यांनी केले.गणेशोत्सवावरूनही जरांगे यांनी सरकारला टोला लगावला. गणेशोत्सव आपला आहे. आम्ही ११ दिवस गणपती बसवतो आणि ते दीड दिवस बसवतात. ते आम्हाला देव-देव शिकवतात. आमच्याएवढे पुण्य कोण करतो? असे ते म्हणाले.दरम्यान, परभणीचे खासदार संजय (बंडू) जाधव यांच्या शेतकरी मेळाव्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीवरूनही जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. या मेळाव्याबाबत आपण इशारा दिला होता, तरीही तो पार पडला. याबाबत बोलताना जरांगे म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी दौरा रद्द केला होता. मात्र, दहा मिनिटांनी काही अधिकाऱ्यांनी जरांगे पाटलांनी सूट दिल्याचा संदेश त्यांना दिला.

### गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीने...

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आणखी तीव्र होण्याची शक्यता असताना मुख्यमंत्र्यांच्या या आवाहनामुळे चर्चेला नवे वळण मिळाले आहे. उत्सवाचा आनंद कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषण टाळून सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याचा संदेश फडणवीस यांनी दिला आहे.

### भाजपच्या बैठकीतील जेवनाची...

विविध ठिकाणी तपासणी आणि कारवाईला वेग आला आहे. हॉटेल, खाद्यपदार्थांची दुकाने यांच्यापासून विविध संस्थांपर्यंत एफडीएकडून तपासण्या केल्या जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीतील जेवणाची झालेली तपासणी चर्चेचा विषय ठरली आहे.

### राहुल गांधींवर अॅट्रासिटीचा...

बेकायदेशीर ठरवली असतानाही अशा प्रकारचे आचरण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. या वक्तव्यावरूनच तक्रार दाखल करण्यात आली. हल्द्वानीचे सिटी एसपी मनोज कात्याल यांनी गुन्हा दाखल झाल्याची पुष्टी केली असून, प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सांगितले.

### सीजेपीच्या मोर्चाला...

मांडण्यास सांगण्यात आले असून, १० सप्टेंबर रोजी पुढील सुनावणी होणार आहे. दरम्यान, अभिजीत दीपके यांच्या सीजेपीने केंद्र सरकारवर आश्वासने पूर्ण न केल्याचा आरोप केला आहे. विद्यार्थी आणि आंदोलकांविरोधातील गुन्हे मागे घेण्याच्या मागणीसह सरकारच्या कथित दिरंगाईविरोधात हा शांततापूर्ण युवा मोर्चा काढण्यात येणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४